**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२२८३/२०१५**
**महाराष्ट्र शासन वि. सचिन जाधव**
**निशाणी – १३**

**साक्षीदार क्रमांक १**

| | | |
|---|---|---|
| साक्षीदाराचे नाव | – | अनिल बाबुराव गंगणे |
| वय | – | ५९ वर्षे |
| व्यवसाय | – | व्यापार |
| राहणार | – | शिवाजी नगर, छत्रपती संभाजीनगर |

**फिर्यादीतर्फे सरतपास सहाय्यक सरकारी विधिज्ञ श्री. एस. बी. भोसले यांचे मार्फत सुरु**

०१. माझ्याकडे स्कुटी क्र. एम.एच.–२०–बी.यु.–५२८८ आहे. दि. २०.०७.२०१४ रोजी मी, माझी मुलगी व पत्नी यांच्यासोबत वेरूळवरून औरंगाबादकडे येत असताना देवगिरी व्हॅली समोर पाठीमागुन मला येणाऱ्या वाहनाने धडक दिली. मला धडक देणाऱ्या कारचा क्र. एम.एच.–१२–ए.एक्स.–७८२६ असा होता. धडक देणाऱ्या वाहन चालकाला मी बघितले होते. पाठीमागच्या वाहनाने मला धडक दिल्यानंतर मी व मुलगी एका बाजुला पडलो व माझी पत्नी दुसऱ्या बाजुला पडली. त्यावेळी मला माझ्या दोन्ही हाताचे मनगट डिसलोकेट झाले होते. माझ्या पत्नीला मांडीला मार लागला होता. माझ्या मुलीच्या कपाळाला डाव्या बाजुच्या भुवईच्यावर मार लागला होता. माझ्या पत्नीला व मुलीला टाके पडले होते. रस्त्यावरील एका कार चालकाने आम्हाला उपचाराकरीता मानीक हॉस्पीटल येथे दाखल केले होते. माझ्या हाताला मार लागलेला होता म्हणुन मला सही करता येत नव्हती. त्यामुळे फिर्यादवर मी अंगठा दिला आहे. आता मला सदरची फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझा अंगठा आहे. त्यास **निशाणी क्रमांक पी.१/पी. डब्ल्यु ०१** देण्यात येते. आरोपीला दाखवल्यास मी ओळखु शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

<u>**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. एस.बी. फदाट यांचे मार्फत सुरू–**</u>

माझा प्रींटींगचा व्यवसाय आहे. मी माझ्या पत्नीच्या नावे आय.टी. रिटर्न भरतो. हे म्हणणे खरे आहे की, वैजापुर हायवे हा रहदारीचा रस्ता आहे. तेथे सतत वाहनांची वर्दळ असते.

**आरोपीतर्फ विधिज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती.**

Digitally signed by SNEHAL SHANKAR JADHAV
Date: 2025.08.18 17:59:10 +0530

**दिनांक –१८.०८.२०२५**
**ठिकाणी – औरंगाबाद**

**(स्नेहल एस. जाधव)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**(न्यायालय क्र.१३), औरंगाबाद**